# नि:शस्त्रीकरण, शस्त्र नियंत्रण व शस्त्रास्त्र स्पर्धा

## Arms Race, Arms Control and Disarmament

### * प्रस्तावना :

अनादिकाळापासून मनुष्य एकमेकांत स्पर्धा करीत आला आहे. मानवी स्वभावाची ही स्पर्धा त्रिकालाबाधित स्वरूपाची आहे. भूतकाळातही ही स्पर्धा बघायला मिळाली, वर्तमान काळातही तिचा प्रभाव कमी झाला नाही आणि भविष्यकाळातही तिची तीव्रता कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. या स्पर्धेतूनच मानवाने एकमेकावर विजय मिळविण्याची आशा अंगी बाळगली. विजय मिळविण्याच्या नादात आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वच राष्ट्रांनी प्रचंड शस्त्रास्त्र आणि अण्वस्त्रांची निर्मिती केली. शस्त्रास्त्रांच्या आधारे पृथ्वीवर अनेक लहान मोठी युद्ध घडून आली आहेत. या युद्धांनी मानवी जीवनच संपून टाकण्याची वेळोवेळी चेष्टा केली. तरीदेखील कोणतेही राष्ट्र नि:शस्त्रीकरणासाठी पुढे येताना दिसत नाही. पहिले महायुद्ध आणि दुसरे महायुद्धांनी मानवी संस्कृतीला विनाशाची चाहुल दिली म्हणून काही राष्ट्रे नि:शस्त्रीकरणासाठी पुढे आली. आज अनेक राष्ट्रांनी काही क्षणांत मानवी संहार घडवून आणणारी अण्वस्त्रे तयार केली आहेत. भीतीपोटी जगातील अनेक राष्ट्रे नि:शस्त्रीकरणासाठी पुढे येत आहेत. विस्टन चर्चिल या भीतीपोटी असे म्हणाले होते की, "युद्धाच्या मूर्खपणाबद्दल आणि निरुपयोगीपणाबद्दल आता सर्वांची खात्री पटली आहे."

### * नि:शस्त्रीकरणाचा अर्थ :

युद्धाची भीती मानवाला पूर्वीपासून होती, परंतु पूर्वीचे युद्धे ही समोरासमोर सैन्यात लढली जात होती. त्यामुळे या युद्धात जनतेला संकटांना जास्तीत जास्त सामोरे जावे लागत नव्हते. आज परिस्थितीत बदल झाला आहे, युद्धे ही समोरासमोर लढली जाणार नाहीत. युद्ध हे अवकाशातूनही लढली जातील, त्यामुळे संपूर्ण मानव जात संकटात सापडेल ही भीती सर्वांच्या मनात आहे; युद्धाच्या विनाशकारी परिणामातूनच नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता निर्माण झाली. जगात शांतता चिरकाल टिकावी म्हणून शस्त्र स्पर्धेला आळा घालणे आवश्यक आहे. शस्त्र वाढीची स्पर्धा कमी करण्यासाठी शस्त्रास्त्रे आणि युद्ध साहित्यास सर्वांनी कपात करणे त्याची निर्मिती बंद करणे व असलेली शस्त्रे नष्ट करणे या कृती कार्यक्रमास नि:शस्त्रीकरण असे म्हणतात.

व्याख्या :

१ ) हॅन्स मॉर्गेन्था : "नि:शस्त्रीकरण म्हणजे शस्त्रास्त्र कपात अथवा निर्माण झालेली शस्त्रास्त्रे नष्ट करणे होय."

२ ) श्लैचर : "नि:शस्त्रीकरण म्हणजे दोन किंवा दोनपेक्षा जास्त राष्ट्रांमध्ये झालेल्या कराराद्वारे शस्त्रास्त्रांमध्ये कपात, त्यांच्यावर नियंत्रण किंवा त्यांना पूर्ण नष्ट करणे होय."

* नि:शस्त्रीकरणाचे प्रकार : नि:शस्त्रीकरण ही संपूर्ण जगाच्या संरक्षणासाठी एक आवश्यक बाब झाली आहे. या तत्त्वाचा सर्वांनी अंगीकार केला तर जगात शांतता व मानवजात सुरक्षित राहील अन्यथा अशा भयावह स्वरूपाच्या अण्वस्त्रांमुळे संपूर्ण सजीव सृष्टी क्षणात नाहीशी होईल अशी स्थिती आहे. नि:शस्त्रीकरणाचे अनेक प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे –

**१ ) सामान्य नि:शस्त्रीकरण :** सामान्य नि:शस्त्रीकरणात सर्व राष्ट्रांनी भाग घेतला पाहिजे, याचा अर्थ असा की, सर्व राष्ट्रांनी सर्वच प्रकारची शस्त्रास्त्रे व अण्वस्त्रे नष्ट करून जागतिक शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, याचे उदाहरण आपणास इ. स. १९२२ च्या नौसैनिक शस्त्रीकरण वॉशिंग्टन करारात मिळते. ज्यावर सर्व शक्तिशाली राष्ट्रांनी हस्ताक्षर केले. त्यानंतर इ. स. १९३२ मध्ये जागतिक नि:शस्त्रीकरण सम्मेलनात जगातील सर्वच राष्ट्रे सहभागी झाली होती. या सामान्य नि:शस्त्रीकरण प्रकारात संपूर्ण शस्त्रास्त्रे नष्ट करण्यावर भर दिला जातो.

**२ ) स्थानिक नि:शस्त्रीकरण :** स्थानिक नि:शस्त्रीकरणात दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रे सहभागी होतात. हे नि:शस्त्रीकरण गटातील सर्व राष्ट्रांवर बंधनकारक स्वरूपाचे असते. याची सर्वांनी काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. इ. स. १८७१ मध्ये अमेरिका आणि कॅनडा यांच्यामधील 'रश - बागोट करार' हे एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.

**३ ) मात्रात्मक नि:शस्त्रीकरण :** मात्रात्मक नि:शस्त्रीकरणात राष्ट्राकडे उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांची कपात केली जाते. अथवा ती पूर्णपणे नष्ट केली जावित हा उद्देश असतो. इ. स. १९३२ च्या जगातील नि:शस्त्रीकरण सम्मेलनात हे ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न सर्वच राष्ट्रांनी केला होता.

**४ ) गुणात्मक नि:शस्त्रीकरण :** गुणात्मक स्वरूपाच्या नि:शस्त्रीकरणात विशिष्ट प्रकारची शस्त्राते नष्ट करण्याचा विविध राष्ट्रे आग्रह धरतात. यामध्ये अण्वस्त्रांचा आणि रासायनिक शस्त्रास्त्र नष्ट करण्याचा मानस असतो. इ. स. १९३२ च्या

जागतिक नि:शस्त्रीकरणास अशा प्रकारची शस्त्रास्त्रे नष्ट करण्यात यावी यासाठी ग्रेट ब्रिटनने मोठा प्रयत्न केला होता.

५) **व्यापक नि:शस्त्रीकरण :** नि:शस्त्रीकरणाचा हा एक व्यापक आणि पूर्ण स्वरूपाचा प्रकार आहे. या पद्धतीत जगातली सर्वच शस्त्रास्त्रे आणि अण्वस्त्रे नष्ट केली जातील. राष्ट्राजवळ सैन्य असणार नाही. संरक्षण मंत्रालय असणार नाही, शस्त्रास्त्रे निर्माण करणारी कारखानेही बंद केले जातील, सैनिक प्रशिक्षण संस्थादेखील बंद केल्या जातील.

६) **अनिवार्य नि:शस्त्रीकरण :** आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा प्रकारचे नि:शस्त्रीकरण अनिवार्य समजले जाते, त्यात सक्तीचा वापर केला जातो. जेणेकरून संबंधित राष्ट्र पुन्हा युद्धाची तयारी करणार नाही. पहिल्या महायुद्धांनंतर व्हर्सायच्या तहात जर्मनीची लष्करी शक्ती कमी करण्यात आली, याचबरोबर पहिल्या महायुद्धानंतर जपान आपली लष्करी ताकद वाढवू लागला म्हणून इंग्लंड व अमेरिका यांनी वॉशिंग्टन परिषदेनुसार जपानची लष्करी ताकद कमी करण्याचा आवर्जून प्रयत्न केला.

७) **ऐच्छिक नि:शस्त्रीकरण :** नि:शस्त्रीकरणाचा हा ऐच्छीक आणि मर्जीनुसार अमलात आणता येणारा प्रकार आहे, काही राष्ट्रे स्वत:च्या इच्छेनुसार, नि:शस्त्रीकरणासाठी प्रयत्नशील असतात. दुसऱ्या महायुद्धानंतर नि:शस्त्रीकरणाला ऐच्छिक स्वरूप प्राप्त झाले. युनोचे नि:शस्त्रीकरणासंदर्भातले आदेश अमेरिका आणि सोव्हियत रशिया या राष्ट्रांनी नामशेष केले. हा नि:शस्त्रीकरणाचा इतिहास आहे.

*** नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता :**

आज नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता का निर्माण झाली आहे. या बाबतीत जागतिक स्तरावर विचारमंथन चालू आहे. पृथ्वीच्या संरक्षणसाठी नि:शस्त्रीकरण अत्यंत आवश्यक आहे. ती एक प्रत्यक्ष गरजच झाली, असे विचार प्रत्येकाच्या मनात येत आहे. नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता पुढीलप्रमाणे -

१) **शांतता व सहजीवन :** आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता व सहजीवन निर्माण करणे ही काळाची गरज आहे. यंत्रयुगात मानवाने प्रचंड प्रगती केली आहे. त्यासोबतच शस्त्रास्त्रे आणि अण्वस्त्रदेखील तयार केली आहेत. त्यामुळे राष्ट्रेही युद्धखोर बनत चालली आहेत. राष्ट्रा-राष्ट्रांत तणावाचे, संघर्षाचे आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झालेले दिसते. शक्ती सामर्थ्याच्या जोरावर राष्ट्रे वरचढ बनत चाललेली आहेत, नि:शस्त्रीकरण घडून आले तर राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष आणि युद्धे

टाळली जातील, राष्ट्रांकडे पुरेशी शस्त्रास्त्रेच उपलब्ध नसली तर युद्ध करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. बऱ्याच राष्ट्रांत सतत शस्त्रास्त्रांची निर्मिती होत असते. ही शस्त्रास्त्रे नकळत दहशतवाद्यापर्यंत पोहचतात ते त्याचा गैरवापर करून मानवी जीवन विस्कळीत करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग होतो. यासाठी नि:शस्त्रीकरण आवश्यक आहे. नि:शस्त्रीकरणाच्या माध्यमातून शस्त्रास्त्रे नष्ट झाली तर दहशतवादाचा प्रश्न उद्‌भवणार नाही आणि शांतता व सहजीवन निर्माण करण्यास मदत होईल. या संदर्भात क्लाऊडचे असे मत आहे की, "शस्त्रसाहित्य व सैन्यशक्तीत वाढ झाली की राज्यकर्त्यांमध्ये युद्धाची जबरदस्त आकांक्षा निर्माण होते, म्हणून जागतिक शांततेसाठी नि:शस्त्रीकरण आवश्यक आहे."

२ ) **आर्थिक विकास :** जागतिक स्तरावर शस्त्रास्त्र निर्मीतीसाठी एक प्रकारची स्पर्धा निर्माण झालेली दिसते. अनेक राष्ट्रे शस्त्रास्त्र शक्ती वाढविण्यासाठी प्रचंड पैसा खर्च करतात. हाच खर्च समाजाच्या विकासासाठी केला तर जनतेचे आणि राष्ट्राचे कल्याण होऊ शकते. सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार होऊ शकते. जगातील जवळपास सर्वच राष्ट्रे भरभक्कम रक्कम युद्ध तयारीसाठी राखून ठेवतात. एवढी मोठी रक्कम मानवावर खर्च झाली तर संपूर्ण जग सुजलाम् - सुफलाम् होऊ शकते. शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने मानवी जीवनच नष्ट होऊ शकते. आज सर्व राष्ट्रांसमोर अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. बेकारी, दारिद्र्य, आरोग्य, लोकसंख्यावाढ, पर्यावरण प्रदूषण, कुपोषण या समस्यांनी राष्ट्र-राष्ट्रांत थैमान घातले आहे. या समस्यांवर शस्त्रास्त्रांचा खर्च झाला तर नक्की आर्थिक विकास साधता येईल. जागतिक स्तरावर १९९८ ते २००२ पर्यंत सैन्य खर्चात सहा टक्क्यांनी वाढ झाली.

३ ) **नैतिक कारण :** शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे शक्ती सामर्थ्यात मोठी वाढ होते, आणि त्यामुळे युद्धे घडून येतात. युद्धात विनाकारण मानवी संहार होतो. संपूर्ण सजीव सृष्टी धोक्यात येते. या प्रकारची मनुष्य हानी होणे ही संपूर्ण जगासाठी अनैतिक बाब आहे. ग्रीनच्या मते, "युद्ध ही एक नैतिक चूक आहे." पहिल्या महायुद्धामुळे व दुसऱ्या महायुद्धामुळे अनेक निष्पाप लोक व लहान बालकांचा बळी गेला. हा मानवी संस्कृतीला लागलेला एक शाप होता. पहिल्या महायुद्धात ८५ लाख माणसे मारली गेली. हा एक प्रकारचा नैतिक अपराध आहे. आज यंत्र युगामुळे मनुष्य अतिशय जवळ आला आहे. जगाचे रूपांतर एका छोट्याशा खेड्यात झाले आहे. सर्वांनी मिळून मानवी संस्कृतीचे रक्षण करण्याची ही वेळ आहे. त्यासाठी नि:शस्त्रीकरण हा एक महत्त्वाचा भाग आहे.

४) संस्कृतीचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी : मानवाचा विकास हा संघर्षातून झालेला आहे. मानवी विकासाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. आजपर्यंतचा मानवी विकास हा संघर्षमय राहिलेला आहे. शस्त्रास्त्रांच्या जोरावर जगात तिसरे महायुद्ध घडून आले तर काही क्षणांत ही मानवी संस्कृती नष्ट होऊ शकते. त्यासाठी निःशस्त्रीकरण हा एक महत्त्वाचा पर्याय आहे. ही शस्त्रास्त्रे दहशतवाद्यांच्या हातात गेली तर पृथ्वीवर हाहाकार निर्माण होऊ शकतो. हजारो वर्षांचा इतिहास असलेली आणि नैतिक मूल्ये जपणारी ही संस्कृती शस्त्रास्त्रांच्या वापरामुळे नष्ट होऊ शकते. त्याचबरोबर पर्यावरणाचे मोठे नुकसान होऊ शकते. शस्त्रास्त्रांच्या वापरामुळे व युद्धामुळे प्रचंड प्रमाणात पर्यावरण प्रदूषण घडून येते. अमेरिकेने इराकवर आक्रमण केले तेव्हा समुद्रावर काळा पाऊस पडला होता. ही पर्यावरण प्रदुषणाची उदाहरणे आहेत. निःशस्त्रीकरण घडून आल्यास युद्ध होणार नाही. त्यामुळे मानवी संस्कृतीचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन होईल.

**५) परस्पर सहकार्य व विश्वास :** राष्ट्रा-राष्ट्रांत परस्पर सहकार्य व विश्वास निर्माण करण्यासाठी निःशस्त्रीकरण आवश्यक आहे. आज अमेरिकेसारखी राष्ट्रे शस्त्रास्त्रांच्या बळावर जगाला आपल्या इशाऱ्यावर चालवत आहेत. लहान राष्ट्रे त्यांच्या हातातील बाहुले बनली आहेत. असेच शस्त्रीकरण वाढत राहिले तर राष्ट्राराष्ट्रांत तणावाचे व संघर्षाचे व अविश्वासाचे वातावरण कायम राहील, अविश्वासातून शेवटी युद्ध घडून येते. युद्धामुळे माणसा-माणसांतील विश्वास नाहीसा होतो. मानवच मानवाचा वैरी बनतो. त्यामुळे माणसातील सद्‌भावना नष्ट होते. यासाठी राष्ट्राराष्ट्रांत जागतिक पातळीवर परस्पर सहकार्य व विश्वास निर्माण करण्यासाठी निःशस्त्रीकरण एक आवश्यक बाब आहे.

### ※ निःशस्त्रीकरणासाठी झालेले प्रयत्न :

जागतिक स्तरावर ज्या राष्ट्रांनी शस्त्रास्त्र तयार केली त्या राष्ट्रांना देखील आपण सुरक्षित आहोत याची शाश्वती नाही. म्हणूनच ही राष्ट्र देखील निःशस्त्रीकरणासाठी पुढे येताना दिसतात. मनुष्य युद्धखोर असला तरी तो शांतताप्रियदेखील आहे. यासाठी मानवाने वेळोवेळी निःशस्त्रीकरणासाठी प्रयत्न केले आहेत. निःशस्त्रीकरणासाठी झालेले प्रयत्न पुढीलप्रमाणे –

**१) पहिली हेग परिषद (१८९९) :** पहिल्या महायुद्धाअगोदर 'सत्ताच सर्वात मोठा न्याय होता.' त्या काळात केल्या गेलेल्या निःशस्त्रीकरणास विशेष महत्त्व नव्हते. जागतिक स्तरावर कोणतेच राष्ट्र पुढे आले नव्हते, की आपणास

नि:शस्त्रीकरणासाठी काही प्रयत्न करायचे आहेत. इ. स. १८९९ च्या पहिल्या हेग परिषदेत नि:शस्त्रीकरणा संदर्भात पहिला प्रस्ताव संम्मत करण्यात आला की, "मानवतेच्या भौतिक आणि नैतिक कल्याणासाठी सैनिक शस्त्रास्त्रांचे नियंत्रण होणे अत्यंत आवश्यक आहे.

२ ) दुसरी हेग परिषद ( १९०७ ): नि:शस्त्रीकरणासाठी दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद झारच्या प्रयत्नाने हेग येथे घेण्यात आली. नि:शस्त्रीकरणाच्या दृष्टिकोनातून टाकले गेलेले हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल होते. नि:शस्त्रीकरणाच्या अतिशय गंभीर प्रश्नासाठी तज्ञांची एक प्रमुख समिती नेमण्यात आली होती. परंतु या परिषदेत निर्णायक स्वरूपाच्या कोणत्याच बाबींना हात घालण्यात आला नव्हता. शस्त्रास्त्रे दिवसेंदिवस वाढत आहेत. अशी फक्त चिंता व्यक्त करण्यात आली होती. नि:शस्त्रीकरणाची सुरूवात म्हणून या परिषदेत एक ब्रिटिश ठराव सम्मत करण्यात आला होता.

३ ) विल्सनचे चौदा मुद्दे ( १९१९ ) : जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांची १४ तत्त्वे जगप्रसिद्ध आहेत. ८ फेब्रुवारी १९१९ रोजी प्रसिद्ध केलेली त्यांची ही तत्त्वे नि:शस्त्रीकरणसाठी महत्त्वपूर्ण मानली जातात, त्यात असे स्पष्ट करण्यात आले होते की, अंतर्गत सुरक्षितता लक्षात घेऊन तसेच राष्ट्राने शस्त्रास्त्रे कमी करावीत असे निश्चित करण्यात आले होते. नि:शस्त्रीकरणाच्या दृष्टीने आणि शांततेच्या दृष्टीने एका बलशाली राष्ट्रांने टाकलेले ही एक महत्त्वपूर्ण बाब होती.

५ ) राष्ट्रसंघाची सनद ( १९२० ) : आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. राष्ट्र संघा सनदेतील आठव्या अनुच्छेदात असे स्पष्ट करण्यात आले होते की, सदस्य राष्ट्रांनी शांततेचा स्वीकार केला आहे; त्यासाठी प्रत्येक राष्ट्राने शस्त्रास्त्रांवर नियंत्रण ठेवावयास हवे, सुरक्षा समितीने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कोणालाही जास्तीत-जास्त शस्त्रास्त्रे बाळगता येणार नाहीत. तसेच तेविसाव्या अनुच्छेदानुसार शस्त्रे व दारूगोळा यांच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार राष्ट्र संघाकडे असेल. नि:शस्त्रीकरणासाठी राष्ट्रसंघाच्या सनदेतील ही महत्त्वपूर्ण कलमे होती.

४ ) व्हर्सायचा तह ( १९१९ ) : पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीवर व्हर्सायचा तह लादण्यात आला. या तहाद्वाने जर्मन सैन्यात व शस्त्रास्त्रांत मोठी कपात करण्यात आली. त्याचबरोबर दारूगोळ्याचे कारखाने नष्ट करण्यात आले. हे नि:शस्त्रीकरणातील

राहिले. सोव्हिएट संघाने ठरावाच्या बाजूने मतदान केले.

१९. ११ फेब्रुवारी १९७१ रोजी अमेरिका, ब्रिटन व रशिया यांनी मॉस्को, लंडन व वॉशिंग्टन येथे 'Nuclear Free Seabed Treaty' समुद्रतळ व महासमुद्रातील तळ, आण्विक शस्त्रे व संहारक शस्त्रापासून मुक्त ठेवण्याबाबत एक संधी केली. महासभेने पुढे या संधीस स्वीकृती दिली. या संधीप्रमाणे समुद्रतळावर अण्वस्त्रे किंवा संहारक शस्त्रे ठेवण्यास मनाई करण्यात आली. परंतु प्रादेशिक समुद्राचा १९ किलोमीटर्सचा भाग त्यातून वगळण्यात आला. समुद्रतळाचे निरीक्षण करण्याचे अधिकार देखील परस्परांना देण्यात आले. रशियाने संधीला मान्यता दिली. भारताने संधीचा विरोध केला. महाशक्तींना त्यात विशेष लाभ होता, चीनने ही संधी दोन महाशक्तींनी परस्परात केलेला संधी म्हणून फेटाळून लावली.

अमेरिका व रशियाचे संबंध मागील काही वर्षापासून सुधारू लागले आहेत. प्रे. निक्सन यांनी मे १९७२ मध्ये मॉस्कोला भेट दिली. याप्रसंगी या दोन देशात आण्विक युद्धबंदी करार झाला. निःशस्त्रीकरण व शस्त्रकपातीबाबतही चर्चा झाली.

त्यानंतर साम्यवादी पक्षाचे श्री. ब्रेझनेव्ह यांनी अमेरिकेला दिलेल्या भेटीत निःशस्त्रीकरणावर पुन्हा विचार करण्यात आला. अशाप्रकारे संयुक्त राष्ट्रात व त्याबाहेरही निःशस्त्रीकरणाचे व शस्त्रकपातीचे अनेक यशस्वी प्रयत्न झाले आहेत.

अमेरिका व रशिया यांच्यात मागील ४-५ वर्षापासून लष्करी डावपेचासाठी उपयुक्त असलेल्या शस्त्रास्त्रांवर नियंत्रण घालण्याच्या दृष्टीने वार्ता सुरू आहे. यास साल्ट (Strategic Arms Limitations Talks) असे म्हणतात. काही शस्त्रास्त्रांच्या नियंत्रणाबाबत मतैक्य झाले असले तरी ही संधी पूर्ण झालेली नाही. दोन्ही महाशक्तींनी शस्त्रनिर्मितीची स्पर्धा चालूच ठेवली आहे. या साल्ट संधीत अनेक अडचणी मधून मधून निर्माण होत असतात.

अमेरिकेने तयार केलेले क्रुज प्रक्षेपणास्त्र (Cruise Missile) हे मानव विरहीत अण्वस्त्रवाहक आहे. या प्रक्षेपणास्त्राचा समावेश साल्टमध्ये करावा अशी रशियाची मागणी आहे. तसेच रशियाने तयार केलेले बॅक फायर बॉम्बर्स साल्टमध्ये समाविष्ट करावे असा अमेरिकेचा आग्रह आहे. अमेरिकेने नुकत्याच तयार केलेल्या न्यूट्रॉन बॉम्बची मानवविनाश शक्ती लक्षात घेता साल्टमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या. परंतु फेब्रुवारी १९७८ मध्ये साल्ट करारासंबंधी दोन्ही महाशक्तींच्या प्रतिनिधींची बोलणी पुन्हा प्रारंभ झाली. त्यानंतरच्या काळात अमेरिका व रशियामध्ये साल्ट-२ करार झाला.

**निःशस्त्रीकरणाच्या प्रयत्नाचे परीक्षण व त्यातील अडथळे**

१. नवीन शस्त्रे व विशेषतः परमाणु-शस्त्रे ही वैज्ञानिकांच्या प्रयोगशाळेतील प्रयोगांची फळे आहेत. आजच्या विज्ञान व तंत्रविज्ञानाच्या काळात शस्त्र नियंत्रणाबाबत संतुलन फार काळ टिकू शकत नाही. शांततेसाठी झालेले नवीन शोधदेखील हे संतुलन बिघडवतील.

२. युद्ध हे निःशस्त्रीकरणाच्या जादुच्या कांडीने नष्ट होणार नाही. संघर्ष त्यानंतरही चालूच राहतील. संघर्ष किंवा युद्ध हे आजच्या राष्ट्रराज्य व्यवस्थेचे लक्षण आहे. जगाच्या इतिहासात प्रतिपक्षाजवळ जेव्हा शस्त्रे कमी होती त्याचवेळी त्यावर आक्रमणे झालेली आहेत. क्विन्सीराईट् याबाबत म्हणतात -

"Disarmament may not affect the frequency of war, for people determined to fight will fight, even in the absence of superior weapons."

३. नियंत्रण व निरीक्षणाची पद्धत अंमलात आणणे कठीण आहे. प्रयोगशाळा बंद केल्या तरच हा प्रश्न सुटू शकेल. जोपर्यंत युद्धाची इच्छा राहील तोपावेतो शस्त्रनिर्मितीची अभिलाषा कायम राहील.

४. शस्त्राने संरक्षण करणे हे राष्ट्रांना जास्त सुरक्षित व खात्रीलायक वाटते. निःशस्त्रीकरणामुळे संरक्षण होईल याची खात्री वाटत नाही.

५. सैन्यावर होणारा खर्च कोणत्याही राष्ट्राने कमी केलेला नाही. उलट बडी राष्ट्रे लहान राष्ट्रांना शस्त्रपुरवठा करून त्यांच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करताना दिसतात.

६. निःशस्त्रीकरणाच्या मार्गात राष्ट्रवाद व सार्वभौमत्वाची लालसा या दोन प्रमुख अडचणी आहेत. शस्त्रागाराचे आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे निरीक्षण होऊ देणे राज्ये अमान्य करतात. राष्ट्रे जोपर्यंत आपली परमाणू अस्त्र भांडारे आंतरराष्ट्रीय नियंत्रणासाठी खुली करीत नाहीत, तोपर्यंत निःशस्त्रीकरणाचा प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाही.

७. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरमधील कलम ४३ व ४५ याप्रमाणे राष्ट्रांना युनोच्या मदतीसाठी आपले सैन्य पाठविण्याचे बंधन पाळावे लागते. राष्ट्रांना सैन्य व शस्त्रे ठेवणे चार्टरप्रमाणे आवश्यक आहे; अशी राष्ट्रांची समजूत आहे. हा विचार निःशस्त्रीकरणाशी विसंगत आहे.

८. आजच्या स्पर्धात्मक जगात सर्व राष्ट्रे शस्त्रे नष्ट करण्यास तयार होतील ही कल्पना अविश्वसनीय आहे. या प्रयत्नांना आंशिक यशच फारतर मिळू शकेल.

९. जी राष्ट्रे अण्वस्त्रधारी बनू पाहत आहेत, ती निःशस्त्रीकरणाची योजना स्वीकारणार नाहीत. त्यामुळे या मार्गात अनेक अडथळे उत्पन्न झाले आहेत.

१०. निःशस्त्रीकरणाबाबत प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताचा विचार करूनच आपले मत व्यक्त करीत असते, त्यामुळे या संमेलनांना यश आलेले नाही. परस्परांचे ठराव फेटाळण्याची वृत्ती आढळून येते.

११. परस्परांबद्दल संदेह किंवा अविश्वास ही मोठी अडचण आहे. भयप्रद व संदेहपूर्ण वातावरणात निःशस्त्रीकरणाचे प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाहीत.

## अण्वस्त्रांच्या संदर्भात निःशस्त्रीकरण
## (Disarmmament in the Nuclear context)

अण्वस्त्राच्या संदर्भात निःशस्त्रीकरणाच्या समस्येला असाधारण महत्त्व आहे. अण्वस्त्रांची जागतिक संहारशक्ती ही जुन्या शस्त्रांपेक्षा फार मोठी आहे. अण्वस्त्र जास्त विध्वंसक व संहारक असतात हे सिद्ध झाले आहे. राष्ट्रे जोपावेतो ही शस्त्र निर्माण करीत राहतील तोपावेतो जागतिक शांतता स्थापन होणे शक्य नाही.

ही शस्त्रे विश्वविनाशक आहेत म्हणून त्यांचा विचार संपूर्ण जगालाच करावा लागेल. अण्वस्त्रधारी राष्ट्रांना निःशस्त्रीकरणाचे ध्येय गाठण्यासाठी अण्वस्त्रांचा त्याग करावा लागेल. म्हणूनच आज अमेरिका, सोव्हिएट संघ, फ्रांस, भारत, ब्रह्मदेश, सिलोन इत्यादी राष्ट्रे वेगवेगळ्या संमेलनाद्वारे निःशस्त्रीकरण यशस्वी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

अण्वस्त्रे विश्वविनाशक आहेत, अण्वस्त्रधारी राष्ट्रे जर त्यांचा उपयोग करतील तर ती स्वतःदेखील नष्ट होतील. विजयी राष्ट्राला युद्ध-विजयाची फळे चाखता येणार नाहीत. म्हणजेच राष्ट्रांची भांडणे कितीही विकोपाला गेली तरी त्यांना अण्वस्त्रांचा वापर करता

येणार नाही.

द्वितीय महायुद्धानंतर निःशस्त्रीकरणाच्या कचाट्यात बडी राष्ट्रे सापडली. शस्त्रसंपन्न राष्ट्रे अण्वस्त्रांच्या जागतिक विनाशाच्या भीतीमुळे एकत्र आली आहेत.

इ.स. १९४५ ते १९४८ पावेतो अमेरिका हेच एकमेव अण्वस्त्रधारी राष्ट्र होते, त्यावेळी सोव्हिएट संघाने अण्वस्त्रे नष्ट करावी असा आग्रह धरला. परंतु अमेरिकेने त्यास नकार दिला, इ.स. १९४९ मध्ये सोव्हिएट संघास अणुबॉम्बनिर्मितीत यश मिळाले. इ.स. १९५२ मध्ये अमेरिकेने हायड्रोजन बॉम्बचा विस्फोट करून ती शस्त्रस्पर्धेत पुढे गेली. त्याचबरोबर सोव्हिएट संघाने इ.स. १९५३ मध्ये हायड्रोजन बॉम्बची निर्मिती केली व त्यामुळे दोन्ही राष्ट्रे तुल्यबल झाली. त्यानंतर दोन्ही राष्ट्रांनी अण्वस्त्रांना शीघ्रगतीने वाहून नेणाऱ्या वाहनांचे म्हणजेच आंतरखंडीय प्रक्षेपणास्त्रांचे (ICBM) शोध लावले. या नवीन वाहनांनी निःशस्त्रीकरणाच्या सभा गाजविल्या. ब्रिटन, फ्रांस व चीनने अण्वस्त्रांची निर्मिती करून अण्वस्त्रधारी राष्ट्र बनण्याचा मान मिळविला. अमेरिकेने गतिमान प्रक्षेपणास्त्रांच्या सहाय्याने चंद्रावर विजय मिळविला तर सोव्हिएट संघाला पृथ्वीवरून नियंत्रण करून चंद्रावर गाडी चालविण्यात यश मिळाले. आता इतर ग्रहांकडे या राष्ट्रांनी आपली दृष्टी वळविली आहे. भारताने इ.स. १९७४ मध्ये अण्वस्त्रांची चाचणी केली. शांततेच्या कार्यासाठी अण्वस्त्रांचा उपयोग केला जाईल असे जरी वारंवार भारतीय पुढारी सांगत असले तरी भारताचा क्रम आज अण्वस्त्रधारी राष्ट्रात होऊ लागला आहे. १९८५-८६ पासून अमेरिकेच्या सहाय्याने पाकिस्तानही अण्वस्त्रधारी बनत आहे.

**६ राष्ट्रांची दिल्ली येथील परिषद** - २८ जानेवारी १९८५ रोजी दिल्ली येथे ६ राज्यांच्या प्रमुखांची निःशस्त्रीकरणाबाबत परिषद झाली. त्यात अर्जेंटिना, ग्रीस, स्वीडन, मेक्सिको, टांझानिका आणि भारताचे राजीव गांधी यांची बैठक झाली. त्यात अण्वस्त्रधारी राज्यांनी अण्वस्त्र चाचणी प्रयोग त्वरीत बंद करण्याबद्दल विनंती करण्यात आली. तसेच अंतरिक्षातील शस्त्रांच्या निर्मिती, विकास आणि त्यांचे परिवहन बंद करण्याबाबत आवाहन करण्यात आले. निःशस्त्रीकरणाच्या संदर्भात संयुक्त राष्ट्राच्या पद्धतीवर भर द्यावा आणि शस्त्र निर्मितीवरील खर्च विकास कार्यासाठी खर्ची पडावा अशी सूचना करण्यात आली.

**रीगन-गोर्बाचेव्ह परिषद** - १९८५ चे शेवटी रीगन-गोर्बाचेव्ह यांच्या जिनेव्हा येथील भेटीत अण्वस्त्र समाप्तीबद्दलचा प्रश्न निघाला. त्यात अमेरिकेच्या स्टार वॉरच्या धोरणामुळे अडथळे उत्पन्न झाले. शेवटी दोन्ही पुढाऱ्यांनी एक संयुक्त पत्रक काढले. त्यात उच्च पातळीवरील पुढारी व अधिकारी यांमध्ये या विषयावर सतत विचार विनिमय व्हावा याबद्दल एकमत झाले. पुढे गोर्बाचेव्ह यांनी १६ जानेवारी १९८६ रोजी दोन्ही राष्ट्रांनी १५ वर्षात अण्वस्त्रांची क्रमशः समाप्ती करण्यासंबंधीचे वेळापत्रक मांडले परंतु अमेरिकेने ते फेटाळून लावले.

**रेक्जाविक परिषद (१९८६)** - गोर्बाचेव्ह व अध्यक्ष रीगन यांची ऑक्टोबर १९८६ मध्ये निःशस्त्रीकरणाबाबत एक बैठक झाली. यात कोणताही करार झाला नाही परंतु स्ट्रेटेजिक शस्त्रांची ५०% कपातीबाबतचा विचार झाला. स्ट्रेटेजिक डिफेन्स इनिशिएटिव्ह प्रोग्राम (SDI) बाबत हे संशोधन व उपक्रम फक्त प्रयोगशाळेपुरता मर्यादित ठेवावा हे सोव्हिएट संघाचे मत अमान्य केले.